# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **02/02/2023**

**Brief of the work done :-**

स्ट्रीट लाईट खांबांची चोरी करणारे दोघे पो.स्टे. मालेगाव पोलिसांच्या ताब्यात ; 10 लाखांचा मुद्देमाल जप्त.

# स्ट्रीट लाईट पोल चोरटे गजाआड

## ११ लाखाचा मुद्देमाल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मालेगाव** ■ वाशिम - मालेगाव महामार्गावरील लोखंडी स्ट्रीट लाईट पोल चोरट्यांना मालेगांव पोलिसांनी मुद्देमालासह जेरबंद केले आहे. सदर चोरट्यांकडून १० लाख ९४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

वाशिम मालेगाव रोडचे रूंदीकरणाचे काम सुरू असून या महामार्गावर लावण्यासाठी आणलेले लोखंडी स्ट्रीट लाईट चे पोल चोरून मालेगाव येथील भंगार च्या दुकानात आणण्यात येत असल्याची गोपनीय तसेच विश्वसनीय माहिती पोलिस उपनिरीक्षक राहुल गंधे सहायक पोलिस उपनिरीक्षक रवि सैबेवार पोलिस हेड कॉन्स्टेबल कैलास कोकाटे, प्रशांत वाढणकर पोलिस कॉन्स्टेबल अमोल पाटील यांना खबऱ्या कडून मिळताच त्यांनी ठाणेदार दत्तात्रय आव्हाळे यांना सदर माहिती दिली.




ठाणेदारांच्या आदेशांनुसार वरील पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मालेगांव च्या नविन बस स्टैन्ड जवळील भंगाराच्या दुकानावर पाळत ठेवली. थोड्याच वेळात दुकानामध्ये एक पिकअप ज्यामध्ये स्ट्रिट लाईटचे लोखंडी पोलचे तुकडे घेवुन जातानी दिसला. वरून सदर भंगार दुकाणामध्ये जावून सदर लोखंडी पोलचे पिकअप वरील ड्रायव्हर सोहेल खान अयाजखान व सोबती विशाल विष्णू नानोटे यास विचारपुस केली असता त्यास सदर लोखडी पोलचे बिल किंवा इतर कोणतेही कागदपत्रे दाखविले नाहीत करीता मालेगाव येथुन पिकअप क्रमांक एम एच ३७ टि २२५३ किमंत ९ लाख रुपये व १३ लोखंडी पोलचे तुकडे किमंत ७८ हजार रुपये असे जप्त करण्यात आले आहे.

तसेच तामसी फाटा येथे जावून तामसी रोडने सुद्धा चोरीचा माल लपवल्याचे समजले वरून तेथे ६ लोखंडी पोलचे तुकडे किमंत ३६ हजार रुपये व अखंड ८ लोखंडी पोल किंमत ८० हजार रुपये असे पंचासमक्ष जप्त करण्यात आले आहे.

असा एकूण १० लाख ९४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल पोलीस स्टेशन मालेगाव येथे जप्त करून आरोपी विरुद्ध कलम ४१(१)(ड) जा. फो . प्रमाणे कारवाई करण्यात आली.या मार्गाने पोलिसांनी जास्तीची गस्त वाढवावी अशी मागणी सुध्दा नागरीक करीत आहेत. (श. प्र.)

### आणखी आरोपीचा शोध सुरू

सदर चोरी प्रकरणांमध्ये आणखीन काही जणांचा समावेश आहे काय याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे. तसेच हा चोरीचा माल कुठे विकला जाणार होता याबाबत देखील पोलीस कसून चौकशी करणार असल्याची माहिती आहे.